क्रमांक : ६५४७/क-३ (लेखा)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई.
दिनांक: ०७ एप्रिल, २०२६

# ::परिपत्रक::

**विषय : सेवार्थ प्रणालीतील अधिकारी/कर्मचारी यांचे ई-केवायसी पूर्ण करण्याबाबत...**

**संदर्भ : (१) वित्त विभाग शा.नि.क्र.२०२२/प्र.क्र.२९/२०/कोषा प्रशा-४ दिनांक २७/०३/२०२६**

**(२) अधिदान व लेखा कार्यालय यांचे पत्र क्र.संकीर्ण २०२६/६४८/मंआस्था- दिनांक ३० मार्च, २०२६**

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील वित्त विभाग शासन निर्णयानुसार सेवार्थ प्रणालीत उपलब्ध असले बँक खाते आधार क्रमांकांशी संलग्न नसेल तर असे खाते त्वरीत बदलण्यात येऊन सेवार्थ प्रणालीती आधार क्रमांकांशी संलग्न असलेले बँक खाते अद्ययावत करण्यात यावे, असे निर्देशित केले आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी सेवार्थ प्रणालीमध्ये असलेले बँ खात्याशी आधार क्रमांक संलग्न (Link) आहे का हे पहाणे व आधार क्रमांकाशी संलग्न (Link नसल्यास त्वरित बँक खाते बदलून किंवा आधार क्रमांक संलग्न असलेले बँक खात्याचा तपशी क-३ लेखा शाखेस त्वरित देण्यात यावा.

सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी वेतन देयक जमा होत असलेल्या बँक खात्याशी आधार क्रमांक **ई-केवायसी** पूर्ण केल्याबाबत सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील विवरणपत्र बँकेमार्फत साक्षांकित करुन क-३ लेखा शाखेस दिनांक १५ एप्रिल, २०२६ पर्यंत सादर करावे. **उक्त संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार ई- केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे माहे एप्रिल २०२६ देय माहे मे, २०२६ वेतन आहरीत करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

तरी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी सदर माहिती तात्काळ क-३ (लेखा) शाखेस उपलब्ध करुन देण्यात यावी जेणेकरुन माहे एप्रिल २०२६ चे वेतनदेयक विहित वेळेत अधिदान व लेखा कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

आदेशानुसार,
08/04/2026

**(नयना चव्हाण)**
**कक्ष अधिकारी तथा**
**आहरण व संवितरण अधिकारी**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

नाव :-

पदनाम:-

कार्यालय :-

दिनांक:-

प्रति,

**उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०००३२.

**विषय : सेवार्थ प्रणालीतील ई-केवायसी पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत..**

**महोदय,**

१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दिनांक २७ मार्च, २०२६ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार **मी प्रमाणित करते/करतो की, माझी ई-केवायसी प्रक्रिया मी वैयक्तिकरित्या पूर्ण केली असून माझे बँक खाते क्रमांक आधार क्रमांकाशी संलग्न आहे.**

२. सेवार्थ प्रणालीतील पॅन कार्ड तपशील अद्ययावत करण्यासाठी खालीलप्रमाणे माहिती सादर करीत आहे.

| | |
|---|---|
| **सेवार्थ आयडी** | |
| **आधार क्रमांक** | |
| **बँकेचे नाव** | |
| **खाते क्रमांक** | |
| **IFSC क्रमांक** | |
| **पॅन क्रमांक** | |

**दिनांक :** **अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव पदनाम व स्वाक्षरी**

**ठिकाण :**

F:\VARSHA 27-09-2021\CERTIFICATE.doc